# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०९/१०/२०२६ (शुक्रवार )**

## खुनाच्या गुन्हयातील आरोपीला मा. न्यायालयाने सुनावली आजीवन कारावासाची शिक्षा

पोलीस स्टेशन खापा :– फिर्यादी लक्ष्मीकांत उर्फ बापुर मोतीलाल गागाटे, रा किल्लापुरा खापा यांच्या रिपोर्टवरून पोलीस स्टेशन खापा येथे अप. क्र. ३२०/२०२५ कलम १०३(१) भा.न्या.सं सह कलम ३,२५ भारतीय शस्त्र अधिनियम अन्वये गुन्हा नोंद झालेला होता.

**सदर गुन्हयाची हकीकत याप्रमाणे आहे की, मृतक चेतन अशोक गागाटे, वय २५ वर्षे, रा. हनुमान घाट, शहापुरा, खापा, ता. सावनेर, जि. नागपुर याचे आरोपी अर्जुन देविदास निळे, वय ३० वर्षे, रा डोंगेघाट, खापा याच्याशी मागील ५ ते ७ वर्षांपासून सुरू असलेल्या वादातून वैमनस्य होते. आरोपी अर्जुन निळे याच्या अवैध व्यवसायात मृतक चेतन हा बाधक ठरत असल्याने आरोपीने चेतन यास जीवे मारण्याची धमकी दिली होती. दिनांक १३/०६/२०२५ व १४/०६/२०२५ रोजी खापा येथील बाजारपेठेत आरोपीने चेतन यास धमकावून त्याच्याशी वाद घातला होता. दिनांक १५/०६/२०२५ रोजी खापा बाजारपेठेत चेतन व आरोपी अर्जुन निळे यांच्यात वाद झाला त्या वादामध्ये अर्जुन निळे याने चेतनचा पाठलाग करून त्याचेवर अग्निशस्त्राचा वापर करून त्याचा खुन केला.**

**तपासी अधिकारी श्री. अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा (तत्कालीन सहाय्यक पोलीस अधीक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, सावनेर) आणि श्री सागर खर्डे, सहाय्यक पोलीस अधीक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, सावनेर यांनी सदर प्रकरणाचा सखोल तपास करून आरोपी विरूध्द सबळ पुराव्यानिशी दोषारोपत्र मा. न्यायालयात दाखल केले. दिनांक ०९/१०/२०२६ रोजी मा. जिल्हा व सत्र न्यायधीश १४ श्री बी. एम. धानुरे यांनी नमुद आरोपी अर्जुन देविदास निळे, वय ३० वर्षे, रा डोंगेघाट, खापा**

**कलम १०३(१) भान्यासं अन्वये आजीवन कारावास व १०००/—रूपये दंड, दंड न भरल्यास ६ महीने सश्रम कारावास अशी शिक्षा सुनावली आहे.**

सरकारचे वतीने ए.पी.पी. श्री नितीन तेलगोटे काम पाहीले. सदर खटल्याच्या सुनावली दरम्यान श्री सागर खर्डे, सहा पोलीस अधीक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, सावनेर उपविभाग, पोलीस निरीक्षक श्री चंद्रकांत काळे ,प्रभारी अधिकारी,पोलीस स्टेशन खापा, पोलीस निरीक्षक श्री विशाल गिरी, दोषसिध्दी कक्ष, नागपुर ग्रामीण, सहा. पोलीस निरीक्षक श्री विशांत नांदगाये, पोहवा श्री गणेश भुरे, ब.नं १५८२, नेम. दोषसिध्दी कक्ष, नागपुर ग्रामीण तसेच मपोना वर्षा धुर्मळ,ब.नं १७१७ ,पैरवी अधिकारी, खापा पोलीस स्टेशन यांनी महत्वपुर्ण योगदान दिले.

## शासकीय कामात अडथळा निर्माण करणाऱ्या आरोपीस मा. न्यायालयाने सुनावली कारावासाची शिक्षा

**पोलीस स्टेशन कळमेश्वर** :—फिर्यादी पोलीस हवलदार संजय वानखेडे ब.नं १९१८ यांच्या तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे अप क्र. ८८९/२०२३ कलम ३५३, ३५४(अ),२९४,१८६,५०४,५०६भादंवि अन्वये गुन्हा नोंद झालेला होता.

**दिनांक १३/१०/२०२३ रोजी पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे यातील फिर्यादी पोलीस हवलदार संजय वानखेडे ब.नं १९१८ हे कर्तव्यावर असताना आरोपी दीपक मनोहर टेकाडे, वय २९ वर्षे, रा. रोहणा, ता. नरखेड, जि. नागपूर याने यातील फिर्यादीच्या शासकीय कामात अडथळा निर्माण करून धक्काबुक्की व मारहाण केली, तसेच महिला पोलीस अंमलदार आणि महिला सफाई कर्मचारी यांच्यासमोर अश्लिल कृत्य केले तसेच वाद घालून अश्लील शिवीगाळ केली आणि जीवे मारण्याची धमकी दिली.**

श्री मनोज टिपले, पोलीस उपनिरीक्षक, नेम पोलीस स्टेशन कळमेश्वर यांनी सदर प्रकरणाचा सखोल तपास करून आरोपी विरूध्द सबळ पुराव्यानिशी दोषारोपत्र मा. न्यायालयात दाखल केले. आज दिनांक ०९/१०/२०२६ रोजी **मा. जिल्हा व सत्र न्यायधीश क्र २० श्री पी.एस. पांडे यांनी नमुद आरोपी दीपक मनोहर टेकाडे, वय २९ वर्षे, रा. रोहणा, ता. नरखेड, जि. नागपूर याला कलम ३५३ भादवि मध्ये ६ महीने साधा कारावास व ३,०००/—रू दंड, दंड न भरल्यास १ महीना साधा कारावास , कलम २९४ भादवि मध्ये १ महीने साधा कारावास व १,०००/—रू दंड, दंड न भरल्यास ७ दिवस साधा कारावास, ५०४ भादवि मध्ये ३**

**महीने साधा कारावास व २०००/—रू दंड, दंड न भरल्यास १५ दिवस साधा कारावास अशी शिक्षा सुनावली आहे.**

सरकारचे वतीने ए.पी.पी. श्रीमती दिपीका गवळी यांनी काम पाहीले. सदर खटल्याच्या सुनावली दरम्यान श्री सागर खर्डे, सहा पोलीस अधीक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, सावनेर उपविभाग, पोलीस निरीक्षक श्री मनोज काळबांधे , प्रभारी अधिकारी,पोलीस स्टेशन कळमेश्वर पोलीस निरीक्षक श्री विशाल गिरी, दोषसिध्दी कक्ष, नागपुर ग्रामीण, सहा. पोलीस निरीक्षक श्री विशांत नांदगाये, सहा फौजदार श्री मनोज तिवारी, ब.नं १६४१, नेम. दोषसिध्दी कक्ष, नागपुर ग्रामीण तसेच श्रेणी पोउपनि सुरेंद्र ठाकुर ,पैरवी अधिकारी, कळमेश्वर पोलीस स्टेशन यांनी महत्वपुर्ण योगदान दिले.

## नागपूर ग्रामीण पोलीस दलातर्फे आगामी सण—उत्सवांच्या पार्श्वभूमीवर ध्वनी प्रदूषणाबाबत जारी करण्यात आली अधिसूचना

मा. श्री, हर्ष पोद्दार, वरीष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांनी आगामी नवरात्रोत्सव व धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या अनुषंगाने तसेच नागपूर ग्रामीण जिल्हा हद्दीत विविध धर्मियांचे सण, उत्सव, धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रम तसेच मिरवणुकांच्या अनुषंगाने या काळात मोठ्या आवाजातील ध्वनीक्षेपक, लाऊडस्पिकर, डॉल्बी आणि मल्टिपेअर साऊंड सिस्टिममुळे ज्येष्ठ नागरिक, लहान मुले, विद्यार्थी व रुग्णांच्या आरोग्याला गंभीर बाधा पोहोचू शकते. सार्वजनिक शांतता भंग होऊ नये आणि कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती बिघडू नये, यासाठी पोलीस विभागातर्फे नागपूर ग्रामीण जिल्ह्यात ध्वनी प्रदूषणाबाबत कडक निर्बंध लादले आहेत.

**सदर आदेश दिनांक २० सप्टेंबर २०२६ चे मध्यरात्री ००:०१ वाजल्यापासून ते ३१ ऑक्टोबर २०२६ रोजी चे रात्री २४:०० वाजेपर्यंत नागपूर ग्रामीण जिल्ह्याच्या संपूर्ण हद्दीत लागू राहतील.**

नागपूर ग्रामीण जिल्ह्यातील सर्व नागरिकांना खालील अटी व नियमांचे पालन करणे बंधनकारक राहिल.

१) परवानगी आणि मर्यादा— ध्वनीक्षेपक किंवा लाऊडस्पिकर वापरण्याची परवानगी मिळाल्यानंतरही संबंधीत आयोजकांनी The Noise Pollution (Regulation and control) Rules, २००० मध्ये निर्धारित केलेल्या ध्वनि मर्यादेचे काटेकोर पणे पालन करणे बंधनकारक राहील.

२) रात्री २२.०० वा. ते सकाळी ०६.०० वा या कालावधीत जिल्हादंडाधिकाऱ्यांनी विहित केलेले विशेष दिवस वगळता, ध्वनीक्षेपक, लाऊडस्पिकर आणि ॲम्प्लीफायर वापरण्यास पूर्णपणे सक्त मनाई आहे.

• **<u>परिसरनिहाय डेसिबल (dB) मर्यादा :–</u>**

अ) औदयागिक क्षेत्रात आवाजाची तिव्रता :—दिवसा ७५ dB(A) व रात्री ७० dB(A),

ब) वाणिज्य क्षेत्रात आवाजाची तिव्रता :— दिवसा ६५dB(A) व रात्री ५५dB(A),

क) निवासी क्षेत्रात आवाजाची तिव्रता :—दिवसा ५५ dB(A) व रात्री ४५dB(A),

ड) शांतता क्षेत्र (Silence Zone) तिव्रता :— ५० dB(A) व रात्री ४०dB(A),

यापमाणे आवाजाची मर्यादा असणे बंधनकारक असेल. तसेच The Noise Pollution (Regulation and control) Rules, २००० मधील तरतूदी व शासनाने वेळोवेळी दिलेल्या आदेशांच्या अधीन राहून निर्बध राहतील.

३) कुठल्याही मिरवणूक व इतर कार्यकमाकरीता ध्वनीक्षेपक/साउंड सिस्टिम वापरण्याकरीता पुढील निर्देश देण्यात येत आहे.

अ) दोन टॉप व दोन मिड्स वापरण्यास परवानगी राहील. (वरील मुददा क ०२ मध्ये नमुद निर्देश/अटींचे अधीन राहून ही परवानगी राहील)

ब) बास सिस्टिम वापरण्यास पुर्णता मनाई राहील.

क) प्लाझमा साउंड सिस्टिम वारण्यास पुर्णत मनाई राहील.

ड) प्रेशर मिड सिस्टिम वापरण्यास पुर्णत मनाई राहील.

इ) लेझर लाईट व उच्च तिव्रतेचा झकमगणारा लाईट्स वापरण्याची पुर्णता मनाई राहील.

४) रुग्णालये, शैक्षणिक संस्था, न्यायालये व शासनाने अधिसूचीत केलेल्या इतर Silence Zone परिसरात लागू असलेल्या ध्वनीमर्यादा व निर्बंधांचे काटेकोर पालन करावे.

५) परवानगीच्या अटींचे उल्लंघन किंवा ध्वनी प्रदूषणाच्या नियमांचे उल्लंघन आढळल्यास संबंधितांविरूध्द पर्यावरण सरंक्षण कायदा १९८६ आणि ध्वनी प्रदुषण (विनियमण व नियंत्रण) नियम २०००, च्या तरतुदी नूसार तसेच महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ कलम १३६, ७० अन्वये कारवाई करण्यात येईल.

सदर आदेशाचे भंग करणाऱ्यांविरूध्द महाराष्ट्र पोलीस अधिनियम सन १९५१ चे कलम १३४, १३६ अन्वये तसेच इतर विहित प्रचलित कायद्यान्वये कार्यवाहीस पात्र राहतील तसेच

महाराष्ट्र पोलीस अधिनियम सन १९५१ कलम ७० अन्वये ध्वनीक्षेपकाचे साहित्य जप्त करण्यात येईल.

नागपूर ग्रामीण पोलीसांव्दारे सर्व नागरिक, दुर्गादेवी मंडळांचे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना शांतता राखण्यासाठी व नियमांचे पालन करण्यासाठी सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात येते.

## पोलीस स्टेशन मौदा अंतर्गत सोना रेस्टाँरंन्ट बार अन्ड लाँजीग माथनी मध्ये वेश्या व्यवसाय चालविणाऱ्यावर गुन्हा नोंद, एका पिडीतेची सुटका, मौदा पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन मौदा :—** मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात श्री.शशांत एन.एम., सहायक पोलीस अधीक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी कन्हान विभाग यांच्या नेतृत्वात सहा पोलीस निरीक्षक श्री भारत लसंते, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन मौदा यांच्यासह मौदा पोलीसांनी दिनांक ०८/१०/२०२६ रोजी **सोना रेस्टाँरंन्ट, बार ऑन्ड लाँजीग, भामेवाडा रोड, माथनी येथे वेश्या व्यवसाय चालविणाऱ्यावर गुन्हा नोंद करून एका पिडीतेची सुटका करत एका आरोपीला अटक केली आहे.**

दिनांक ०८/१०/२०२६ रोजी मौदा पोलीसांना गुप्त बातमीदारकडुन खात्रीशीर माहिती मिळाली की, **पोलीस स्टेशन मौदा अंतर्गत** आरोपी **सागर रामचंद्र पिसे, रा.माथनी, ता. मौदा हा सोना रेस्टाँरंन्ट, बार ऑन्ड लाँजीग, भामेवाडा रोड, माथनी येथे स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता महिला व मुलीनां पैशांचे आमिष देवून देहव्यापारास प्रवृत्त करून लोकांकडून पैसे घेवुन अवैधरित्या कुटंनखाना चालवुन देहव्यापार करवुन घेत आहे.** अशी माहीती प्राप्त होताच मौदा पोलीसांनी सोना रेस्टाँरंन्ट, बार ऑन्ड लाँजीग येथे धाड टाकली असता **आरोपी सागर रामचंद्र पिसे, वय २९ वर्षे, रा माथनी ता मौदा हा मिळुन आला. त्याला विचारपुस केली असता हॉटेल मालकाबाबत विचारपुस केली असता मालक स्वत: असल्याबाबत माहीती प्राप्त झाली.** पोलीसांनी पंचासमक्ष घटनास्थळाची पाहणी केली असता नमुद ठिकाणी एक पिडीत महीला मिळुन आली. नमुद पिडीत महीला नागपुर येथुन मौदा आल्याची माहीती पोलीसांना समजली. आरोपी स्वत:च्या आर्थिक फायदयाकरिता नमुद महीलेला पैश्यांचे आमिष देवून देहव्यापार करण्यास प्रवृत्त करून जागा उपलब्ध करून देवुन तिच्याकडुन देहव्यापार करवुन घेत असल्याची माहीती पिडीतेने पोलीसांना दिली.

**सदर प्रकरणी सागर रामचंद्र पिसे, वय २९ वर्षे, रा माथनी ता मौदा यांच्या विरूद्ध कलम ३,४,५, ७ स्त्रीया व मुली अनैतिक व्यापार (प्रतिबंध) अधिनियम अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे. तसेच मिळुन आलेल्या पिडीतेची सुटका करण्यात आली आहे.**

## जनावरांची अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद ५ जनावरांची सुटका, वडोदा पोलसांची कामगिरी

पोलीस स्टेशन वडोदा :— दि. ०९/१०/२०२६ रोजीचे सकाळी वडोदा पोलीस पेट्रोलींग करीत असतांना गुप्त बातमीदाराकडुन माहिती मिळाली की, गुमथळ्याकडून भवरीकडे एका बोलेरो पिकअप मधून जनावरांची अवैध वाहतूक होत आहे. अशी माहीती प्राप्त होताच वडोदा पोलीसांनी गुंमथळा ग्रामपंचायत चौकाजवळ नाकाबंदी केली असता नाकाबंदी दरम्यान एक बोलेरो पिकअप वाहन क्रमांक एम एच ४९ ए टी ९६१२ हे वाहन मिळुन आले. आरोपी वाहन **चालक क्रं १) सलमान इजराइल शेख, वय ३० वर्ष , रा.सहायता नगर, ता. पवनी, जि. भंडारा** आणि **त्याचा साथीदार २) मोहसीन नासिर शेख, वय ४० वर्ष राह. वाजपेयी नगर, कामठी, नागपूर हे दोघे मिळुन आले.** पंचासमक्ष वाहनाची पाहणी केली असता वाहनाचे मागील डाल्यात ३ म्हशी आणि २ हेले हे जनावरे निर्दयतेने कोंबुन आखुड दोरखंडाने बांधुन जनावरांना चारापाण्याची व्यवस्था न करता वाहतुक करतांना मिळुन आले.

पोलीसांनी पंचासमक्ष १) बोलेरो पिकअप वाहन, क्रमांक एम एच ४९ ए टी ९६१२ किंमती ४,००,०००/— रुपये २) ३ म्हशी किंमती ७५,०००/— रुपये आणि ३) २ हेले ५०,०००/— रूपये असा एकुण ५,२५,०००/—रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. नमुद प्रकरणी आरोपीतांविरूध्द कलम ११(१) (ड), (इ), (एफ) प्राणी छळ प्रतिबंधक अधिनियम सहकलम ३(५) भान्यासं अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.




## पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी हद्दीतील सराईत गुन्हेगार नितेश मनोज राठोड याला नागपुर जिल्हयातुन केले हद्दपार

**पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी हद्दीतील सराईत आरोपी नितेश मनोज राठोड,वय २२ वर्षे, रा भारकस, ता. हिंगणा जि. नागपुर याला महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ (१) (अ)(ब) अन्वये नागपुर जिल्हयातुन केले हद्दपार केले.**

सराईत गुन्हेगार नामे **आरोपी नितेश मनोज राठोड,वय २२ वर्षे,रा भारकस, ता. हिंगणा जि. नागपुर** यांचे विरूध्द महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम अन्वये, अवैध जुगार तसेच शरीराविरूध्दचे अनेक गंभीर गुन्हे नोंद आहे. आरोपीचे गुन्हेगारी कृत्यांवर नियंत्रण ठेवण्याकरीता पोलीसांनी वेळोवेळी त्यांचे वर कारवाई करून गुन्हे नोंद केले तसेच त्यांचेवर प्रतिबंधक कार्यवाही सुध्दा केली आहे. परंतु आरोपी याने आपली गुन्हेगारी गतिविधी निरंतर सुरूच ठेवली. आरोपीच्या गुन्हेगारी कृत्यामुळे परीसरातील अनेकांना दारूचे व्यसन जडले आहे. तसेच

आरोपीच्या कृत्यामुळे शांततेचा भंग होवुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची दाट शक्यता असल्यामुळे नमुद आरोपीचा महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ (१) (अ) (ब) अन्वये हद्पार करण्याचा प्रस्ताव एमआयडीसी बोरी पोलीसांनी उपविभागिय पोलीस अधिकारी, नागपुर यांच्या मार्फतीने उपविभागिय दंडाधिकारी, नागपुर यांचे कडे पाठविला असता त्यांनी प्रस्ताव मंजुर करून नमुद आरोपी **नितेश मनोज राठोड याला ६ महीन्यांकरीता** नागपुर जिल्हयातुन हद्दपार केले

**नागपुर ग्रामीण जिल्हा पोलीसांतर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, नमुद आरोपी हा नागपुर ग्रामीण व नागपुर जिल्हा हद्दीत दिसुन आल्यास नजिकच्या पोलीस स्टेशनला तात्काळ माहीती द्यावी.**



**हद्दपार आरोपी नितेश मनोज राठोड**

## अस्तित्व लपवुन गुन्हा करण्याच्या उद्देशाने फिरणाऱ्या ०२ आरोपीतांविरूध्द गुन्हे नोंद

**पोलीस स्टेशन कोंढाळी :—** दिनांक ०८/१०/२०२६ रोजी कोंढाळी पोलीस रात्रगस्त करीत असता आरोपी क्र. १. सुरज गणेश जाधव, रा. पुसागोंदी, ता. काटोल आणि २. कुणाल सुनिल सिंग, रा. गजानन महाराज मंदीर, मागे काटोल रोड हे दोघे मौजा दोडकी ते पांजरा रोड स्वत:चे अस्तित्व लपवुन सुर्यास्तानंतर आणि सुर्योदयाच्या पुर्वी फिरतांना मिळुन आले. तसेच पोलीस वाहन पाहुन लपुन गेले. त्यांना विचारपुसक केली असता त्यांनी असमाधान कारक उत्तर दिले. नमुद आरोपी हे दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने वावरतांना मिळुन आल्याने आरोपींचे विरूद्ध कलम १२२ महाराष्ट्र पोलीस अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## रामडोंगरी व गोसेवाडी रेतीघाटांवरील उत्खनन बंद; अवैध उत्खनन व वाहतुकीस प्रतिबंध करण्यासाठी पोलीस प्रशासनाची नियमित देखरेख

**दिनांक ०९/१०/२०२६ चे एका वृत्तपत्रात रामाडोंगरी मे रेत का खेल अशा शिर्षकाखाली प्रासीत झालेल्या बातमीच्या अनुषंगाने स्पष्ट करण्यात येते की, रामडोंगरी व गोसेवाडी परिसरातील रेतीघाटांवर सध्या रेती उत्खनन पूर्णपणे बंद असून, संबंधित क्षेत्रात अवैध रेती उत्खनन व वाहतूक होऊ नये, यासाठी पोलीस व महसूल प्रशासनामार्फत प्रभावी नियंत्रणात्मक उपाययोजना राबविण्यात येत आहेत.**

**श्री सागर खर्डे, सहा पोलीस अधीक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, सावनेर उपविभाग पोलीस निरीक्षक, श्री चंद्रकांत काळे,प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन खापा तसेच तहसीलदार आणि महसुल प्रशासन यांच्यामार्फत संबंधित क्षेत्राची प्रत्यक्ष पाहणी व अचानक तपासणी नियमितपणे करण्यात येत आहे. याशिवाय, अवैध रेती वाहतुकीस प्रतिबंध करण्याच्या दृष्टीने दररोज नाकाबंदी करण्यात येत असून, संशयित वाहनांची तपासणी करून आवश्यक कारवाई करण्यात येत आहे.**

संबंधित रेती घाटावर २४ तास **CCTV** कॅमेरे कार्यरत असून, घाट परिसरावर सतत देखरेख ठेवण्यात येत आहे. सदर **CCTV** कॅमेऱ्यांचा ॲक्सेस तहसील कार्यालय, सावनेर यांच्याकडे उपलब्ध आहे. तसेच, रेती वाहतुकीसाठी वापरण्यात येणाऱ्या संबधीत वाहनांना **GPS** ट्रॅकर बसविण्यात आले असून, घाटावर वाहन प्रवेशाच्या वेळी संबंधित वाहनांची आवश्यक कागदपत्रे तपासण्यात येतात. शासनाच्या धोरणानुसार सायंकाळी ०६:०० वाजेनंतर रेती उत्खनन करण्यास प्रतिबंध असल्याने, या कालावधीत अवैध उत्खननास आळा घालण्यासाठी संबंधित रेतीघाटांवर **CCTV** कॅमेऱ्यांच्या माध्यमातून देखरेख ठेवण्यात येत आहे. तसेच पोलीस प्रशासनामार्फत सतर्कता बाळगून नियमित गस्त, नाकाबंदी व संशयित वाहनांची तपासणी करण्यात येत असून, अवैध प्रकार निदर्शनास आल्यास नियमानुसार कारवाई करण्यात येते.

तसेच शासन निर्णयानुसार निर्धारित करण्यात आलेल्या घाट व्यवस्थापनविषयक उपाययोजनांचे पालन व अवैध उत्खननास प्रतिबंध करण्यासाठी संबंधित यंत्रणांच्या समन्वयातून आवश्यक ती देखरेख व तपासणी करण्यात येते.

प्रशासनामार्फत करण्यात येत असलेल्या तपासणी व पाहणीदरम्यान संबंधित रेतीघाटांवर कोणत्याही प्रकारचे उत्खनन सुरू नसल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच रामटेक मार्गे भंडारा जिल्ह्याकडून येणाऱ्या वाहनांची रॉयल्टी व संबंधित कागदपत्रांची पडताळणी करून नियमानुसार वाहतूक सुरू आहे. अवैध रेती उत्खनन, विनापरवाना वाहतूक तसेच शासनाच्या महसुलाचे नुकसान करणाऱ्यांवर तसेच नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर आवश्यक ती कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल.

## पोलीस स्टेशन बोरी अंतर्गत सट्टापट्टी चालविणाऱ्या आरोपीविरूद्ध ०२ गुन्हे नोंद

**पोलीस स्टेशन बोरी :—** दिनांक ०८/१०/२०२६ रोजी बोरी पोलीसांनी अवैधरित्या सट्टापट्टी जुगार चालविणाऱ्या आरोपीविरूध्द खालील प्रमाणे दोन गुन्हे नोंद केले.

प्रसाद कॉलनी बुटीबोरी येथे धाड टाकल असता आरोपी क्र ०१. कुणाल गोपीचंद उरकुडे, वय १९ वर्ष, रा. चिमुर वार्ड क्र. ०३ ता. चिमुर जि. चंद्रपुर ह. मु ,प्रसाद कॉलनी बुटीबोरी ता. जि नागपूर आणि आरोपी क्र ०२ .अभिजीत भिमराव शेंडे, वय २० वर्ष, रा. भिंसी तालुका चिमुर जिल्हा चंद्रपुर ह.मु. प्रसाद कॉलनी बुटीबोरी ता.जि. नागपूर हे दोघेही कागदावर आकडे लिहुन सट्टापट्टी चालवित असतांना मिळुन आले. पोलीसांनी दोन्ही आरोपीकडुन रोख रक्कम सट्टापट्टीचे लिहण्याकरीता वापरलेले साहित्य असा एकुण ११६०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

**नमुद दोन्ही आरोपींच्या विरूद्ध कलम १२ (अ) महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये ०२ गुन्हे नोंद करण्यात आला आहे.**

## अवैध दारू निर्मिती, विक्री आणि सेवन करणाऱ्यांवर १० गुन्हे दाखल,

**दिनांक ०८/१०/२०२६ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयात अवैध दारूची निर्मिती, विक्री, साठवणूक तसेच दारूचे सेवन करणाऱ्या व्यक्तींविरुद्ध कारवाई करून दारूबंदी कायद्यान्वये एकूण १० गुन्हे दाखल केले.**

**पोलीस स्टेशन केळवद** येथे आरोपी नामे मारुती बाळाजी राउत, वय ५९ वर्ष, रा. मंगसा, ता. सावनेर याचेवर ०१ गुन्हा नोंद आहे, **पोलीस स्टेशन मोहपा** येथे तुषार मुकींदराव युवनाते, वय २५ वर्षे, रा. बुधला, ता. कळमेश्वर, जि. नागपुर याचेवर ०१ गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन जलालखेडा** येथे आरोपी नामे कपिल धनराज पाचपोर, वय ४२ वर्ष, रा. नविन नारसिंगी, ता. नरखेड, जि. नागपूर याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन नरखेड** येथे आरोपी

सुनिल रोडबाजी कनिरे, वय ४३ वर्ष, रा. वार्ड क्र ०५, नरखेड, याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन काटोल** येथे आरोपी नामे चंद्रकांत उर्फ गोलु मनोहर साठे, वय ३६ वर्ष, रा. खैरी नवघरे, ता. काटोल आणि मुकेश अशोकराव अडागळे, वय ४५ वर्ष, रा. अण्णाभाउ साठे नगर, काटोल यांचेवर प्रत्येकी ०१ गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन बेला** येथे आरोपी नामे रंगीला तुळसीराम पवार, वय ४२ वर्ष, रा. दहेगाव, ता. उमरेड, जि. नागपुर आणि नितीन भिमराव बढीये, वय ३६ वर्ष, रा. पिपरा, ता. उमरेड, जि नागपुर यांचेवर प्रत्येकी ०१ गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद आहे. **पोलीस स्टेशन पारशिवणी** येथे आरोपी नामे सुनिल संपत बुटले, वय ५४ वर्ष, रा. दहेगाव जोशी, ता पारशिवनी आणि सचिन माधवराव घोडमारे वय. ४७ वर्ष रा. वार्ड.नं. ८ स्वामी विवेकानंद नगर, कन्हान त. पारशिवनी जि. नागपुर यांचेवर प्रत्येकी ०१ गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद आहे

**नमुद कारवाईत एकुण १४२२० मिली देशी दारू आणि १० लिटर मोहाफुल दारू असा एकुण ७३२०/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

जनसंपर्क अधिकारी
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर